



IRBK-0115089



निर्विघ्नं कुरु मे देव
सर्व कार्येषु सर्वदा

# यशवंत गाजते कीर्ती

IRBK-0115089

वाचनालय शाखा.
क्र. १५०८८ नों. दि ..............
वि. ८११..४१... क्र. ..............

सर्व हक्क स्वाधीन
'दुहिता'
जयहिंद प्रकाशन
झावबाची वाडी
मुंबई २

• **मुखपृष्ठ**
मोहन वाघ

• **प्रथमावृत्ति**
१२ मार्च १९७४

• **मूल्य : दीड रुपया**

• **मुद्रक**
अ. भि. दळवी
कल्पना आर्ट
२२/२४ काकडवाडी
व्ही. पी. रोड, गिरगांव मुंबई–४

• **प्रकाशक**
जयहिंद प्रकाशन
१० बी, झावबाची वाडी
ठाकुरद्वार, मुंबई २

माननीय यशवंतरावांच्या मातोश्री ति. कै. विठाबाई यांना
प्रेमादरपूर्वक अर्पण

— दुहिता

९४३८ ग्रा.वा
३८८२ १४।३।७८

१९४२ चा सुमार असेल. वर्तमानपत्रें मुलांनी वाचायची तेव्हां पद्धत नव्हती. मोठ्या माणसांचं लक्ष नाहीं असं पाहून लोकमान्य मिळवायचा आणि 'छोडो भारत' असं ठणकावून सांगणाऱ्या शूर देशभक्तांविषयींच्या बातम्या शोधायच्या हा आम्हां मुलांचा छंद असायचा. या छंदाला कारणही तसंच होतं.

आपला देश परदास्यांत आहे. सातासमुद्रांपलिकडून इंग्रज व्यापाराला म्हणून या समृद्ध भारतांत आले. या देशांतील राज्यकर्त्यांना नजराणे देऊन, खूष करून, त्यांनी व्यापाराचं जाळं टाकलं आणि हळूहळू तैनाती फौजेचा फास या राज्यकर्त्यांच्या आणि प्रजेच्या कंठीं करकचून आंवळला. राज्यें खालसा झालीं आणि भारत इंग्लिश साम्राज्याचा गुलाम झाला. इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, अशा कुठल्याच विषयांची ओळख व्हायचंही तें वय नव्हतं. सात ते आठ वर्षांच्या आमच्यासारख्या मुलांन राजकारणांत कांहींही कळत नव्हतं. तरीही, विनतेला कद्रूच्या दास्यांतून सोडवण्यासाठीं अमृत आणणाऱ्या गरुडाची कथा आम्हांला प्रिय होती. शिवाजीमहाराजांनी मावळे जमवले आणि अगदी बालवयांत स्वराज्याचं तोरण बांधलं, या कथा आम्ही उत्सुकतेनं ऐकायचों. "पक्ष्याच्या डोळ्याचा लक्ष्यवेध घ्यायचा असला, तर नजर फक्त त्या पक्ष्याच्या डोळ्यावरच खिळली पाहिजे" असं बजावणारी अर्जुनाची परीक्षा आम्हांला तोंडपाठ असायची.

एकलव्याच्या निष्ठेनं आम्ही भारावून गेलों होतों आणि त्यापेक्षांही या सर्व कथा आम्हांला रसाळपणं सांगता–सांगतां, स्वदेशप्रेम, देशभक्ती आणि स्वदेशी यांची गोडी लावणाऱ्या आमच्या काकांवर आम्ही भलतेच खूष होतों.

काका उणेपुरे फक्त वीसपंचवीस दिवस आमच्याकडे होते आणि एक दिवस काका अचानक निघून गेले; त्याला बरेच दिवस झाले होते. काका कुठे गेले हे कुणीच सांगू शकत नव्हतं. तसा त्यांचा ठावठिकाणा कुठं कुणाला ठाऊक होता? उघड कुणी कांहींच बोलत नसलं तरी, कांहींतरी गुपित होतं खास! खरं म्हणजे, आमच्या घरीं काका आले, तेही साऱ्या गांवाची निजानीज झाल्यावरच!

सकाळीं उठल्यावर हा अनाहूत पाहुणा दिसला. पहिल्यांदा खूप राग आला. आमची अभ्यासाची खोली या आगंतुक पाहुण्यासाठीं जप्त झाली होती. शिवाय त्या खोलीकडे कुणीही फिरकायचं सुद्धां नाहीं, अशी सक्त ताकीद वर होतीच. आमच्या खोलीला आजाऱ्याच्या खोलीचं स्वरूप आलं होतं. मंद निळा रंग, आंत मंद निळा दिवा, खोलीच्या खिडक्या, दरवाजे चकडबंद! शिवाय वर खालीं करतां येईल असा हलता लोखंडी पलंगही खोलींत दिसत होता. या गोष्टींचं मला विलक्षण आकर्षण होतं. मोठेपणीं डॉक्टर व्हायचं आणि आजाऱ्यांना बसतं करायचं निमित्त करून पलंगाला असलेलं चक्र मला फिरवायचं होतं.

घरांत कुणीतरी आजारी असल्याप्रमाणे घरांतलीं मोठीं माणसं कुजबुज करीत बोलायची. गांवांतल्या माणसांची वर्दळ आतां घरापर्यंत पोंचत नसे, आणि आम्हा मुलांनाही इकडे तिकडे जायला बंदीच असे. हा जाच या पाहुण्यानं आणला, म्हणून आम्ही रागावलों. पण हा राग पुरते दोन दिवसही टिकला नाही. बंद दरवाजाआड राहाणाऱ्या या काकांनीच एक दिवस दार किलंकिलं करून आम्हां बाळगोपाळांना आंत बोलावलं. बाबांची गुरगुर ऐकूं आली, तेव्हां उलट तेच हंसून म्हणाले "अहो, या मौनाचा थोडा कंटाळाच आलाय. मुलांशी गप्पा मारल्या, बोललो, हंसलो, तर हरवलेलं बालपण परत मिळाल्याचा आनंद मिळेल." बाबाही विशेष कांहीं बोलले नाहीत आणि आम्ही आमचा खराखुरा काका भेटल्याच्या आनंदांत काकांचे सच्चे दोस्त बनलों.

❋ ❋

## २

काकांचे जाडेभरडे खादीचे कपडे पाहून आम्हाला वाटलं कीं त्यांच्याजवळ पैसे नाहींत, म्हणून त्यांना मऊमऊ कपडे घेतां येत नाहींत, आणि बाबा त्यांना मऊ कपडे आणून देत नाहींत. आम्ही काकांना एक दिवस आमची शंका स्पष्टपणं विचारली. आमचं ते बोलणं ऐकून काका मनापासून हंसले. म्हणाले, " पैसे नाहींत हे तर खरंच, पण आपल्या देशांतील किती लोकांजवळ पुरेसे पैसे आहेत? धान्य आहे? कपडे आहेत? शेतीवर अवलंबून असलेल्या अशिक्षित बांधवांना पैसे मिळवून देणारी चांगली नोकरी नाही, की पुरेसं उत्पन्न देणारं काम नाही. याला तोडगा काय ठाऊक आहे?"

पैसे नसणं, दरिद्री असणं यांतलं दुःख तेव्हां आमच्या डोक्यावरून गेलं. तरीही, आजूबाजूला बरेच लोक गरीब आहेत. त्यांना काम मिळत नाही आणि काम नाहीं म्हणून पैसेही मिळत नाहींत, एवढं मात्र कळलं.

काका म्हणाले, " समज, आपण जाडीभरडी असली तरीही ही खादी वापरूं लागलों, तर ती बनवण्यासाठीं या गरिबांना घरबसल्या सूत कांतून विकतां येईल, त्यांतून त्यांना चार पैसे मिळतील, त्यांच्या तुटपुंज्या उत्पन्नांत भर पडेल, त्यांचीं कच्चींबच्चीं जेवतील, शिक्षण घेतील. ज्यांना आपण नोकरी देऊं शकत नाही, उद्योगाला लावूं शकत नाहीं, त्यांना आपापल्यापरीनं कामाला लावण्याचं समाधान, आपण खादी वापरली तर नक्की मिळेल. नाही का?"

मागणी तसा पुरवठा करणारं, खादी वापरण्यामागचं एवढं अर्थशास्त्र, आणि त्यांतून समाज घडवणं, आमच्या बुद्धिपलिकडचं असलं, तरीही खादी वापरणं चांगलं आहे, माणुसकीचं आहे, दरिद्रिनारायणाला मदतीचा हात देणारं आहे हे नक्कीच लक्षांत आलं.

परदेशी कपडे, परदेशी वस्तू वापरून, आपण आपली संपत्ती, पर्यायानं परदेशांत पाठवतों आणि आपल्या बांधवांना आपणच उपाशी मारतों, या ज्ञानानं आमच्या कोंवळ्या अंतःकरणात स्वदेशी प्रेम आणि स्वदेशीची निष्ठा निर्माण केली. क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके, भगतसिंग, लोकमान्य टिळक, पंडित जवाहरलाल नेहरू, महात्मा गांधी, यांच्या गोष्टी आम्ही उत्सुकतेनं 'सांगा, सांगा' म्हणत ऐकूं लागलों.

'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' या लोकमान्यांच्या सुप्रसिद्ध घोषणेचा प्रतिसाद आमच्या चिमुकल्या मनांतून नकळत उमटत होता. आम्ही ज्या म्युनिसिपल मराठी शाळेंत शिकत होतों, त्याच शाळेंत एके काळीं लोकमान्यही शिकत होते, या माहितीनं आम्ही फुशारलों होतों आणि अशा गोष्टी सांगणारे आमचे हे काका आम्हांला खूपच आवडत असत.

※ ※

काका बरे होऊन, आपल्या घरीं निघून गेले, हे अचानक, एका सकाळी कळलं; आणि मोठा धक्का बसला. काका आजारी होते, हेंच आधी आम्हांला मान्य नव्हतं. खोलीचा थाट आजाऱ्याचा असला तरी काका मुळीच आजारी वाटत नव्हते. त्यांचं अंग कधी गरम लागलं नाही की त्यांनी कधी कसली चिडचिड केली नाही. बाबांनी त्यांच्यासाठी आणलेल्या औषधांच्या बाटल्या, फुलदाणीसारख्या टेबलावरच जशाच्या तश्शा असायच्या. त्यातलं औषध घेतांना मी काकांना फक्त एकदा बघितलं होतं.

एकदा आमचे देशमुखकाका घरी आले होते. खूप म्हणजे काय, खूपच महिन्यांनी आले होते. कुठल्यातरी भूमिगताच्या शोधांत होते म्हणे ते ! आमच्या समोरच्याच घरांत पत्रीसरकारचे (प्रतिसरकारला तेव्हांचा लोकप्रिय शब्द) नाना पाटील दडून राहिले असल्याची गुप्त बातमी देशमुखकाकांना कळली होती. पण शोधाशोध करूनही त्यांना नाना पाटील तिथं मिळाले नाहीत. समोरचंच घर आमचं. हक्कानं चहा प्यायला येणाऱ्या देशमुखकाकांनी दिवाणखान्यांत येतायेता 'आजारी कोण'? असं म्हणत सहज दरवाजा किलकिला केला. काका औषधाच्या बाटलींतून औषध ग्लासांत ओतून पीत होते. डोक्याला आणि गळ्याभोंवतीं मफलर गुंडाळलेला होता. त्यांचा चेहरा खोलींतील अंधुक प्रकाशांत नीटसा दिसतही नव्हता. औषध पिऊन त्यांनी ग्लास शेजारच्या स्टुलावर ठेवला आणि ते किंचित कण्हले, आणि गळ्यापर्यंत पांघरूण घेऊन कुशीला वळून झोपी गेले.

देशमुखकाकांनी दरवाजा बंद केला. माझ्या आई-बाबांचे रोधलेले श्वास संथ झाले असावेत. कारण देशमुखकाकांच्या त्या प्रश्नाला शांत

स्वरांत उत्तर देत बाबा म्हणाले, "आमचे दूरचे नातेवाईक आहेत. दुखणं गंभीर आहे. नक्की निदान झालेलं नाहीं. पण बहुधा घटसर्प असावा. औषधं चालूच आहेत."

घटसर्पाची साथ त्यावेळी आजूबाजूला असावी. घटसर्पाचं नांव आणि बाबांवरचा गाढ विश्वास यामुळंच बहुधा देशमुखकाकांनी अधिक चौकशी केली नसावी. पण बरेच दिवस मला मात्र घटसर्प कसा असतो व तो काकांच्या खोलीत मला कसा दिसला नाहीं, याचं आश्चर्य वाटत होतं.

※ ※

त्यानंतर थोड्याच दिवसांनी काका निघून गेले आणि त्यासाठी मी देशमुखकाकांनाच जबाबदार धरलें. देशासाठी घरदार, आप्तेष्ट सोडून वनवासी झालेल्या या अशा शूरवीरांना पकडण्यासाठीं निष्ठुरपणे आटापिटा करणाऱ्या सगळ्यांचा मला राग यायचा. मनांतल्या मनांत मी देशमुख-काकांशीं कट्टी केली होती. देशमुखकाकांनी त्यानंतर कितीतरी वेळां माझ्या रागाचं कारण खोदूनखोदून विचारलं होतं.

एक दिवस नेहमीप्रमाणं आम्ही वर्तमानपत्राचं सामुदायिक वाचन चालवलं होतं. आणि अचानक आम्हांला काकांचा फोटो दिसला. आम्ही सगळी बाळगोपाळ मंडळी पुन्हा पुन्हा तो फोटो पाहात होतों आणि खात्री करून घेत होतों. सातारा डिस्ट्रिक्ट ( जिल्हा ) कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष आणि भूमिगत कार्यकर्ते श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या अटकेची बातमी होती ती !

आम्ही ज्यांना काका म्हणून हक्कानं गोष्टी सांगायला लावत होतो, आमच्या छोट्यामोठ्या तक्रारींनी हैराण करत होतों, आंगाखांद्यावर नाचत होतों ते आमचे काका म्हणजे आमच्यासाठी स्वराज्य आणायला घराबाहेर पडलेले शूर, भूमिगत कार्यकर्ते होते. त्यांचं नांव यशवंतराव चव्हाण. त्या दिवशीं आजीला आम्ही आमच्या या प्रश्नांनी भंडावून सोडलं. आईजवळ वा बाबांजवळ कांहीं बोलायचीच सोय नव्हती. त्यांचं आपलं एकच असायचं, "मुलांना या गोष्टी करायच्यात कशाला ? आपण आपला अभ्यास करावा आणि खेळावं. फालतू चौकशा नकोत."

आजीनंही विशेष थांगपत्ता लागू दिला नाहीं. पण एवढं बजावलं कीं, "उगाच मूर्खासारखं बडबडूं नका, आणि तो फोटो दाखवून हे आमचे

काका असं कुणाला सांगत बसूं नका. पहा हं, नाहींतर पोलिस येईल आणि तुम्हालाही पकडून नेईल. "

पोलिस म्हणजे आमचे देशमुखकाका ! आणि त्यांनी पकडून नेलंच, तर तुरुंगांत तरी, या यशवंतरावकाकांची भेट होईल, ही आमची बालबुद्धी ! काका, आम्हांला न सांगतां, ओळख न देतां, नांवही न सांगतां निघून गेले. याबद्दलही आम्हाला त्यांना विचारायचं होतंच !

नंदुरबारचा गोळीबार आणि बाळ चिमणची शौर्यगाथा आम्हीं ऐकली होती. पोलिसांच्या बंदुकींचं भय, वरवर तरी वाटत नव्हतं. पण न जाणों, म्हणून आम्ही मुलांनी विचारविनिमय केला आणि काकांच्या आवडत्या खादीप्रचाराचं काम करायचं ठरवलं.

काकांनी शिकवलेली सारीं गाणीं तोंडपाठ होतीं. 'विजयी विश्व तिरंगा प्यारा।' तसंच, 'चरखा चला चलाके। लेंगे स्वराज्य लेंगे।' किंवा, 'नाही भिणार आम्ही मरणाला। करूं स्वतंत्र आतां देशाला।' हीं गाणीं आम्हांला फार आवडायचीं. मात्र मरणाला मधील 'र' उच्चारतांना त्रेधातिरपीट उडायची आणि नाहीं 'भिनाल आम्ही मलाला। कलू स्वतंल आतां देशाला।' असे उच्चार व्हायचे. आम्ही खादी विकायला ज्या ज्या घरीं गेलों तिथं तिथं आयाबायांनी ही सारी गाणीं आमच्याकडून कौतुकानीं म्हणून घेतली. 'दास्य आहे याला कारण करूं त्याचे निराकरण। खणूं दास्याच्या पाळामुळांना ॥' एवढ्या ओळी बोबड्या बोबड्या शब्दांत म्हणेपर्यंत आम्हाला घाईगर्दीनं अशी कांहीं धाप लागायची, की बोलून सोय नाहीं. अखेर, आमच्याजवळची खादी संपली तरी पोलिसांना आमच्याकडे लक्ष द्यायलाही वेळ नव्हता.

एका गोष्टीचं मात्र राहून राहून आश्चर्य वाटायचं. एरव्ही आमच्या उनाडक्यांवर तोंडसुख घेणारे बाबा व आई आमच्या या उद्योगांच्या कागाळ्यांकडे बेमालूम दुर्लक्ष करीत होते.

आतां आमच्या घरांतील वर्दळ पुन्हा वाढली होती. चिंतामणशास्त्री जोशी ( ह्यांना आम्ही शास्त्रीजी म्हणत असूं आणि सोडमुंज झाली नाहीं म्हणून ते कसे बिनकासोट्याचा पंचा घालून राहातात, हा आमच्या चर्चेचा

विषय असायचा.), प्रेमाताई कंटक, अच्युतराव पटवर्धन, साने गुरुजी, ठक्करबाप्पा, जमनादास मेहता, डॉ० बाबासाहेब आंबेडकर, गिरीकाका, एन. एम. जोशी, स्वातंत्र्यवीर सावरकर, मसुरकरमहाराज, अशा कितीतरी मतप्रणालींच्या परंतु एक ध्येयवाक्यतेच्या, स्वातंत्र्याच्या प्रणेत्यांचा, समाज-सेवकांचा सहवास आम्हाला अगदी पोरवयापासून घडत आला होता. पोलीस अत्याचार, सरकारी जुल्मजबरदस्ती, फौजदार इंगवले आणि त्याने चालवलेले अमानुष अत्याचार आणि स्वातंत्र्य-चळवळीच्या रोमहर्षक कथांची आम्ही उत्सुकतेनं चौकशी करत होतों.

याच काळात यशवंतरावकाकांचं व्यक्तिमत्त्व सर्वांगानं बहरत होतं.

※ ※

मराठी ग्रंथ
९४३८
3882
म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. ९५०८ नों. दि.
वि. वा.

५ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤

१२ मार्च १९१३ मध्ये यशवंतरावांचा जन्म देवराष्ट्र येथे झाला. बालपणही तिथंच सरलं होतं. सातारा जिल्ह्यातील या मातीमातींतून समर्थांची शिकवण आणि हिंदवी स्वराज्याच्या मंत्राची प्रेरणा त्यांना मिळाली होती. घरची गरिबी त्यांच्या कर्तृत्वाला आणि हुषारीला झांकळूं शकत नव्हती. उलट, आजूबाजूचा दरिद्री समाज, मागासलेपणा दूर करण्यासाठीं यशवंतरावांच्या मनांत तेव्हांपासून विचारमंथन सुरू झालें होतें आणि त्याची प्रचिती वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी त्यांनी एका वक्तृत्त्वस्पर्धेत दिली.

१९३० साली पुण्याला झालेल्या वक्तृत्वस्पर्धेत खेड्यांच्या सुधारणा-विषयक परिसंवादांत यशवंतरावांनी अत्यंत आवेशानं, आवेगानं पण अभ्यासपूर्ण भाषण करून उपस्थित शहरीजनांना स्तिमित केलं आणि ती स्पर्धा गाजवली.

विद्यार्थिदशेंत असतांना त्यांना शाळेची फी भरणंही शक्य असायचं नाहीं. अंगांत कोट वा पायांत चप्पलही परवडायची नाही. त्यांच्या मातोश्रींनी अपार कष्ट काढून या गुणी मुलाला सुशिक्षित करायचं स्वप्न रंगवलं! खूप शिकून नोकरी मिळवायची आणि घरांत गलेलठ्ठ पगाराचा आंकडा आणला कीं इहलोकी जन्मल्याचं सार्थक मानणारा यशवंतरावांचा पिंड नव्हता. घरची वाईट परिस्थिती असतांही स्वातंत्र्य संग्रामाच्या आवेशानं ते तहानभूक विसरले आणि १९३० च्या, महात्मा-गांधीप्रणीत असहकारितेच्या चळवळींत त्यांनी भाग घेतला. एकामागून एक आलेल्या संकटांना तोंड दिलं.

१९३२ मध्यें त्यांनी अठरा महिन्यांचा तुरुंगवास भोगला. त्यावेळी तुरुंगवास म्हणजे अमर्याद छळ; अमानुष अत्याचार! परंतु त्या कष्टमय काळांतही यशवंतरावांनी मिळेल तितकं ज्ञान करून घेण्याचा सपाटा लावला होता.

राजकीय कैद्यांना राजद्रोही म्हणून खुनी कैद्यांहूनही सापत्न वागणूक मिळायची. सरकारचा रोष नको म्हणून तुरुंगांतून बाहेर आल्यावर कुणाच्या दाराशीं थाराही मिळायचा नाहीं. आप्तस्वकीयांचे हाल व धिंडवडे उघड्या डोळ्यांनी पाहायला लागायचे. अगदी श्रियाळ-चांगुणा कथेंत जसं चिलयाबाळाला स्वतःच्या हातानं कांडतांना सुद्धां 'हंसतमुखानं गीत गा' अशी कठोर सत्त्वपरीक्षा वांट्याला यायची, तस्साच प्रकार व्हायचा. अशा या परीक्षा एकामागून एक देतांनाच यशवंतरावांना वाचनाची, दुःखितांचे दुःख समजून घेण्याची, सहसंवेदनेची अजोड जोड मिळाली. दुःखानं गांजलेल्या माणसानं रागारागाचे केलेले आक्रस्ताळी प्रदर्शन पाहूनही यत्किंचितही तोल न सोडतां, न रागावतां दुःखिताच्या भावना समजून घेऊन यशवंतराव सहृदयतेनं व सहानुभूतीनं त्या दुःखिताच्या भावनांचा विचार करूं शकतात.

यशवंतरावांचे विपत्तीचे दिवस संपले. हातांत सत्ता आली तरी ते भूतकाळ विसरले नाहींत. मोठेपणाचा वा सत्तेचा ताठा त्यांना शिवलाही नाहीं याची साक्ष त्यांच्या क्षणमात्रही सहवासांत येणारी कुठलीही व्यक्ती देईल. त्यांचा सरळ, सौम्य, पण करारी स्वभाव, मृदु आणि मुद्देसूद बोलणं आणि जबरदस्त आत्मसंयम, निरंहकारी वृत्ती, यांमुळे ते सर्वांनाच प्रिय वाटतात. यशवंतरावांच्या सान्निध्यांत त्यांच्या विरोधकांनीही निर्भय असावं, असं जणूं अबोल आश्वासनच त्यांच्या वागणुकींतून मिळत राहातं.

टीकाकारांचा त्यांनी कधीच राग केला नाहीं. उलट टीकेनं फायदा होतो ही त्यांची विचारसरणी असते. आपल्यावर टीका झाली तर स्वतःशींच विचार करतांना, आत्मसमर्थनाच्या प्रयत्नांत आपलीच भलीबुरी बाजू आपल्याला अधिकच सुस्पष्ट होते आणि आपल्याला अधिकाधिक निर्दोष होण्यास मदत होते असंच ते म्हणतात. त्यामुळंच यशवंतराव प्रथम सगळ्यांचं म्हणणं शांतपणं ऐकून घेतात. विरोधही सहन करतात; पण कुठेही कडवटपणा न आणतां जनतेचं कल्याण आणि स्वराज्याचं रक्षण, सुराज्याचं स्वप्न पुरं करण्यासाठीं मोकळ्या मनानं व निर्भय वृत्तीनं कामाला लागतात.

प्रत्येक संकटानं, प्रत्येक आपत्तीनं कांहींतरी शिकवलं, शहाणं करून सोडलं, सहनशक्ती वाढवून दिली अशा विचारांनीच त्यांनी कुठल्याही गोष्टीबद्दल कटुता येऊं दिली नाही.

एके काळी पुस्तक विकत घेण्याची त्यांना ऐपत नव्हती. परंतु त्यामुळं हातीं पुस्तक मिळालं रे मिळालं कीं ते पुस्तक पुन्हा मिळेल न मिळेल या विचारानं बारकाईनं अभ्यासण्याची त्यांना चांगली संवय लागली. संकटांतून सांपडलेली ही जमेची बाजूच यशवंतरावांना महत्त्वाची वाटते.

स्वातंत्र्यपूर्व काळांत आपल्या आप्तस्वकीय भगिनींना सोसावी लागलेली मानखंडना व छळ, यशवंतरावांच्या मनांत स्त्रीजातीच्या गौरवाची भावना निर्माण करून राहिला. त्यांच्या पत्नीच्या—सौ. वेणूताईंच्या अशक्त प्रकृतीबद्दल कोणी प्रश्न काढला तर ते म्हणतात, " तिची प्रकृति खराब व्हायला माझं दुर्लक्ष कारणीभूत आहे. "

स्त्रियांच्या बाबतींत त्यांची दृष्टी नेहमी अत्यंत सहानुभूतीपूर्ण असते. त्यांची हेटाळणी अथवा गैरसोय त्यांच्या निदर्शनास आली तर ते स्वतः लक्ष घालून अडचणी दूर करूं जातात.

कै० विठाबाई म्हणजे यशवंतरावांच्या आई. आपल्या आईला ते फुलासारखे जपत. ' आईविना दैवत नाहीं दुजे ' अशी त्यांची अनन्यसाधारण भक्ती आईविषयीं आहे.

कृतज्ञता, आदर, उपकाराची फेड करण्यास असलेली सूक्ष्म संवेदनाशीलता, विरोधी व्यक्तींबद्दलही एक प्रकारे 'देव त्यांचे भले करो ' अशी सहानुभूती, क्षमाशीलता या सर्व गुणांचे प्रत्यंतर यशवंतरावांच्या खाजगी जीवनांतून मिळतें.

यशवंतरावांचीं स्वतःचीं मुलं जगलीं नाहींत, तरीही त्यांच्या जीवनांतील वात्सल्य अपरिमित आहे. त्यांच्या सहवासांत येणाऱ्या बालकांना ते आपले दोस्तच करतात. एरवी मितभाषणी वाटणारे हे काका या बालगोपाळांशी खूप गप्पा मारतात आणि मुलांत मूल होऊन रंगतात.

यशवंतरावांच्या समतेचा व मैत्रीचा विस्तार तर सर्व जातींतील, व जमातींतील राजकारण, समाजसेवा या कारणांस्तव सहवासांत आलेल्या मंडळींपर्यंत पोंचला आहे. हातीं जबरदस्त सत्ता आल्यावरही ती सत्ता खासगी वा सार्वजनिक शत्रुत्व करणाऱ्यांविरुद्ध वापरण्याची कल्पना त्यांना स्वप्नांतही शिवली नाहीं. जुने मित्र राजकीय पक्ष बदलून विरोधी बनले, तरी यशवंतरावांच्या मनांतील जुने, गोड स्नेहाचे अनुभव तसेच कायम ताजे राहिले, हें त्यांच्या मनःसामर्थ्याचे द्योतक.

※ ※

१९५६ ते १९६२ च्या क्रांतिकारक कालखंडांत प्रथम मुंबई द्विभाषिक राज्याचे व नंतर महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्रिपद मिळाल्यानंतर यशवंतरावांना विरोधी पक्ष आणि असंतुष्ट जनता यांचा मुकाबला करावा लागला. यावेळींच त्यांची बुद्धिमत्ता, मुत्सद्दीपणा, कर्तृत्व आणि नेतृत्व यांचें तेज फांकलें. वादळांतील कर्णधाराप्रमाणं त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणाची नौका यशाच्या तीराला नेऊन पोचवली. भयानकाचा नाश मृदु साधनांनी करतां येतो हे त्यांनीं दाखवून दिलें.

यशवंतरावांचें मन जातिभेदाच्या वैचारिक बंधनांतून मुक्त झालेलें व मानवतावादी बनलेलें आहे. सुसंगत लोकशाही जीवनपद्धती स्थापण्याकरितां ग्रामपंचायती राज्याची नवी योजना जिल्हा परिषदांच्या रूपाने निर्माण करून सत्तेचे विकेंद्रीकरण आणि जनता शासनकार्यांत जास्तीत जास्त सहभागी करून घेण्याचा मार्ग यशवंतरावांनी कार्यान्वित केला— निर्मिला.

स्थानिक मंडळींनी एकमतानं एकत्र यावं, आपल्या अडिअडचणी जातीनं लक्ष घालून सोडवाव्यात, गांवांतले प्रश्न गांवकऱ्यांनीच एकदिलानं, एकमतानं मिटवावेत, ग्रामसुधारणा जनतेला हवी तशी करून घेतां यावी, सर्वस्वी सरकारवर अवलंबून राहाण्याचा परावलंबी आशाळभूतपणा संपावा, आणि देशांत कायदा व सुव्यवस्था राखण्यांत जनतेनंच पुढाकार घ्यावा, व सुखमय जीवन व्हायला कारणीभूत व्हावं हा या सत्तेच्या विकेंद्रिकरणामागचा सरळ साधा उद्देश आणि त्यासाठींच हे पंचायती राज्याचें विशाल शासनतंत्र त्यांनी निर्मिलें.

देशाचा उत्कर्ष झाला पाहिजे. जनतेचें कल्याण साधलें पाहिजे. जनतेमध्ये सर्व धर्म येतात. एकाद्याच जातीचें, वर्गाचें वा समाजाचें कल्याण केल्यास इतरांच्या मार्गांतील ती धोंड बनेल व बरोबरीचे इतर वर्ग, समाज व जाती मागे पडल्याने त्यांच्याशीं निगडित असलेला हा विशिष्ट वर्ग, समाज वा जात देखील शेवटी खोड्यांतच पडेल, याची यशवंतरावांना चांगली जाणीव आहे. म्हणूनच ते कोणत्याही गोष्टीचा विचार करतांना संकुचित जातीय वा वर्गीय दृष्टिकोणांतून न करतां जनता व देश यांचाच प्रामुख्याने विचार करून निर्णय घेतात.

९ ☼ ☼ ☼ ☼ ☼ ☼ ☼ ☼ ☼ ☼ ☼ ☼ ☼ ☼ ☼ ☼ ☼ ☼ ☼

यशवंतरावांच्या ठिकाणची तारतम्यशक्ती तल्लख आहे, हें त्यांच्या सर्वांगिण यशाचें आणखी एक रहस्य आहे. सत्य व असत्य यांचा उलगडा ते चटकन करूं शकतात. भल्याबुऱ्याचा त्यांचा विवेक अचूक असतो. त्यांच्या मनाला पटेल ती गोष्ट करण्यांत ते कधी अळंटळं करणार नाहींत, की कुणाच्या स्तुति-निंदेचा मनाला विचारही शिवूं देणार नाहींत. समाज–जीवन हें सागराला मिळणाऱ्या गंगौघाप्रमाणं शतमुखी असतें, याची त्यांना चांगली कल्पना आहे. समाजाची ही सारी तोंडं समर्थ बनलीं तरच तो समाज उन्नत होऊं शकतो, म्हणून समाजाच्या शेकडों गरजा भागवल्या गेल्या पाहिजेत असें यशवंतरावांचें धोरण असतें.

तमाशाची कला विकसित होण्याचे यशवंतरावांना जितकें महत्त्व वाटते, तितकीच आवश्यकता संस्कृतभाषेच्या पुनरुज्जीवनाचीही वाटते. जिल्हा परिषदांच्या रूपाने जनतेला मिळणाऱ्या राज्यकारभारविषयक प्रत्यक्ष शिक्षणाचें त्यांना जेवढें अगत्य वाटतें तेवढीच उपयुक्तता, नाट्य-प्रयोगांच्या द्वारा, रंजनाबरोबरच होणाऱ्या लोकशिक्षणाचीही त्यांना वाटते. शाळाकॉलेजांची वाढ जेवढी आवश्यक तेवढी उद्योगधंदे व कारखाने यांची भरभराटही अपरिहार्य आहे हें त्यांनी कधीही नजरेआड केलें नाहीं.

समाजपुरुष हा सहस्रपाद आहे. त्याची वाटचाल झपाट्याने व्हायला हवी असेल तर त्याच्या हजारही पावलांची शक्ती सारखीच विकसित झाली पाहिजे याची पूर्ण जाणीव यशवंतरावांना आहे, आणि त्याच दृष्टीने त्यांनी महाराष्ट्रराज्याचे मुख्यमंत्री असतांना अल्पावधींतही असामान्य यश मिळवलें.

☼ ☼

यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले आणि त्यांनी प्रथम एक गोष्ट केली कीं, शासकीय अधिकारीवर्गाला खालपासून थेट वरपर्यंत शासनहेतूची अभ्यासपूर्ण जाणीव राहील याबद्दल व्यवस्था ! दौऱ्यावर असतेवेळीं ते कटाक्षानं स्थानिक मंडळींना भेटून व तसंच सरकारी अधिकारीजनांनाही भेटून त्यांची आस्थेनं चौकशी करतात. बारकाईनं त्यांच्या अडीअडचणींचा विचार करून, शासनसुधारणेच्या दृष्टीनं भेटणाऱ्या व्यक्तींना निर्भिडपणं स्वतःचं मत बोलतां येईल अशा आत्मीयतेनं ते वागतात, बोलतात आणि समोर वा शेजारीं असलेल्या व्यक्तीच्या मनांतला उत्स्फूर्त विश्वास मिळवतात. सहवासांत येणाऱ्या सान, थोर, व्यक्तीलाही यशवंतरावांच्या सान्निध्यांत दिलखुलासपणा वाटावा असंच त्यांचं वागणं असतं. त्यांच्या घराचे दरवाजे समाज आणि शासन यांच्या हिताची माहिती घेऊन भेटायला येणाऱ्या कुणासाठीही सदैव उघडे असतात.

हाताखालच्या अधिकारीवर्गाकडून अपेक्षित असलेलं कर्तव्य आणि आंखून दिलेला कार्यक्रम ते स्पष्टपणं निःसंदिग्ध शब्दांत त्यांना सांगतात. लोकशाही तंत्र शासनाच्या आणि जनतेच्या रोमारोमांत भिनावं म्हणून यशवंतरावांचे पराकाष्ठेचे प्रयत्न चालू असतात. “शासनाचा दृष्टिकोन हा माणुसकी, सहानुभूती व न्यायाचा दृष्टिकोन असावा आणि जनतेच्या अडिअडचणींचा विचार याच तत्त्वांनुसार होत रहावा,” असा त्यांचा आग्रह असतो. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे कोणत्या कामाला काय अग्रहक्क द्यायचा याच्या तारतम्याची ! यशवंतरावांनी आपल्या अधिकारी-वर्गाच्या आचरणांत व शासनसंहितेत या दोन्ही गोष्टींवर कटाक्ष ठेवलेला आहे. राज्यांच्या अभिवृद्धीच्या दृष्टीनं ज्या अत्यावश्यक गोष्टी आहेत त्यांवर अधिकाधिक भर देण्याबाबत ते जागरूक असतात. भारतांतील सर्व राज्यांची अभिवृद्धी म्हणजेच भारताची समृद्धता हेंच त्यांचें ध्येय असतें.

महाराष्ट्रांत शेती आणि उद्योगधंदे यांच्या विकासावर यशवंतरावांनी जास्तीत जास्त भर दिला. राज्यांत सुधारणा सर्वत्र व्हावी व शेतकऱ्याला या सुधारणांचा फायदा घरबसल्या मिळावा हे त्यांनी योजिले. महाराष्ट्रांतील सहकार चळवळ, शेतकऱ्यांचे सहकारी साखर कारखाने यामागची प्रेरणा यशवंतरावांचीच होती.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतांना एकदां राज्यांतील कलेक्टर्सच्या बैठकींत यशवंतरावांनी स्पष्ट सांगितलं, "लोकशाही शासनयंत्रणेची यशस्विता म्हणजे राज्यांतील जनतेचं समाधान. नुसतं चांगलं काम, त्वरित काम म्हणजे कर्तव्य संपलं नव्हे. तुमच्या त्या उत्कृष्ट कार्याचं फळ जनतेला सुखाचं ठरावं, त्वरित मिळावं ही तुमच्या कामामागची तळमळ हवी. शासनावर जनतेचा प्रगाढ विश्वास बसला पाहिजे. तुमचं व्यक्तिशः मत कांहीही असलं, कुठल्याही राजकीय प्रणालीचं असलं, तरीही शासनाच्या चौकटींत राहून काम करतांना, तुम्ही सरकारने आंखून दिलेल्या धोरणानुसार व ठरवून दिलेल्या कार्यक्रमांप्रमाणे कर्तव्य बजावलें पाहिजे. तुमच्या मताने एखादी तक्रारखोर व्यक्ती जरी बदमाष असली, तरीसुद्धां त्या व्यक्तीच्या अडचणी जर सत्य असतील तर त्या व्यक्तीवर कदापि अन्याय होता कामा नये."

यशवंतरावांच्या कारकिर्दीत दूरवरच्या खेड्यांवरील अधिकाऱ्यालाही त्याच्या कामावर आणि वागणुकीवर शासनाचे लक्ष असल्याची जाणीव असते. कांहीं ठराविक दिवसांच्या अंतरानं हाताखालच्या अधिकाऱ्यांना, प्रत्येक खातेप्रमुखांना यशवंतराव भेटतात. त्यांच्या कामाची, अडीअडचणीची अगदी बारीकसारीक चौकशी करतात, आणि उत्तरांत थापेबाजी, अळंटळं ऴपणार नाहीं याची जाणीव अधिकारीवर्गाच्या लक्षांत येतेच आणि वर्षांनुवर्षं जी कामं पडून राहिली होती, ती यशवंतरावांच्या नुसत्या चौकशीनं त्वरित झाल्याचा अनुभव मिळतो. महाराष्ट्रांत मुख्यमंत्री असतांना यशवंतरावांनी जमीनसुधारणा कार्यक्रमाला अग्रक्रम दिला. तसंच जास्तीत-जास्त पंचवीसशे रुपये वार्षिक उत्पन्न असलेल्यांच्या मुलांना प्राथमिक शिक्षण मोफत केलं. 'कसेल त्याची जमीन' अंमलात आणणारा कूळकायदा, यशवंतरावांच्या, डंका न पिटता प्रत्यक्षांत आचरलेल्या समाजवादाचं प्रत्यंतर आहे.

यशवंतरावांचा आणखी एक मोठाच गुण म्हणजे त्यांच्याइतका जिभेवर नियंत्रण ठेवणारा, राजकारणी पुरुष खरोखरीच लाखांत एखादाच असतो. वाणी हे पुढाऱ्याजवळचें अत्यंत प्रभावी अस्त्र !

यशवंतरावांचा आपल्या वाणीवर विलक्षण ताबा आहे. खरं सांगायचं तर लोकोत्तर आहे. मोजकं मृदु आणि मुद्देसूद बोलण्यांत यशवंतराव अग्रेसर आहेत. आपलें मत ठामपणे मांडतांना यशवंतराव प्रतिपक्षावर वाणीचे जखमी प्रहार करीत नाहीत. ते मुद्दयानं मुद्दा खोडून काढतील. वस्तुस्थितीनं विरोध हाणून पाडतील. प्रांजळपणानं प्रतिपक्षाचा ग्राह्यांश पटकन मान्य करतील.

यशवंतराव सर्व विषयांवर बोलतात आणि तेही अभ्यास करून व चिंतनीय विचार मांडणारे ! ते सर्व प्रसंगी बोलतात, सर्वांशी मोकळेपणाने बोलतात. सामान्य खेडुतांच्या सभांपासून तों असामान्य पंडितांच्या परिषदांपर्यंत यशवंतरावांनी केलेले वक्तृत्व सर्वतोमुखीं असतें. त्या त्या श्रोतृवृंदाच्या पातळीवर जाऊन, सर्वांना समजेल असं मिठास भाषण यशवंतराव करतात. त्यांत मुद्दा बळकट, मत निश्चित, आणि हेतू संशयातीत असतो. पण त्यांत कुठेही टवाळी, दुसऱ्याची उणीदुणी काढण्याचा, प्रतिपक्षाला खिजवण्याचा प्रयत्न नसतो. सर्व तऱ्हेची सुष्ट दुष्ट टीका धैर्यानं सोशीत असतांही यशवंतराव शब्दांनी केलेल्या जखमा जन्मभर झोंबत राहातात याची तीव्र जाणीव ठेऊन बोलतात. पराभूत परिस्थितींतही त्यांच्या शब्दांत चीड, द्वेष वा राग यांचा संसर्गही असत नाहीं, कीं विजयी परिस्थितींत अहंकार, उन्माद वा हेटाळणी यांचा स्पर्शही जाणवत नाही. वाणी हे सर्वांची अंतःकरणें काबीज करण्याचें यशवंतरावांचें अमोघ साधन आहे. वाणीचा सच्चा, वृत्तीचा सत्त्वधीर, विचारांचा सात्त्विक, वागणुकीचा सीधासाधा आणि व्यवहाराला सरळ असे यशवंतराव असल्यानं, जातात तिथं सर्वांना आपलंसं करतात व ज्या कामाला हात घालतात ते यशस्वी करतात.

## १२

एक गणित सुटलें कीं लगेच दुसरें हातीं घ्यावें ही यशवंतरावांची काम करण्याची पद्धत. एकाच वेळीं, सगळ्या विचारांची गर्दी माजवून, 'एक ना धड, भाराभर चिंध्या' तिथं नसतात. एखादा पूल ओलांडायचा असला तर तो कसा ओलांडता येईल, या विचारांत वेळ दवडण्याआधी, ते, त्या पुलापर्यंत प्रथम कसं पोचतां येईल हे आधी विचारांत घेतात. व एकामागून दुसरा विचार अशी क्रमवारी लावून घेतात.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतांना त्यांनी महाराष्ट्रांतील राजकीय वातावरणाचा विस्कळितपणा नाहींसा करून महाराष्ट्राचें शासन व संघटना यांच्यांत एकसूत्रता आणण्यासाठीं आणि महाराष्ट्राची घडी परत बसविण्यासाठीं अपार कष्ट घेतले. यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या कोना-कोपऱ्यांतील जनतेंत एक प्रकारची आपुलकीची भावना प्रस्थापित केली. विश्वासाचें वातावरण निर्माण केलें.

यशवंतरावांच्या जीवनांत योगायोगाला फार महत्त्व आहे. त्यांना या योगायोगाबद्दलची जाणीव आहे. म्हणूनच बरेंवाईट कांहींही घडलें तरी ते हुरळूनही जात नाहींत किंवा नाउमेदही होत नाहींत. संकटांना तोंड देणें हाही एकप्रकारें त्यांना योगच वाटतो.

१९४६ साली बाळासाहेब खेरांच्या आमंत्रणावरून, यशवंतरावांनी सचिवालयांत प्रथम पाऊल टाकलें आणि त्यांची अचानक पहिली भेट झाली मोरारजी देसाई यांच्याशीं! मोरारजींनी त्यांना पहिल्या भेटींतच विचारलें, तें, आपल्या खात्यांत काम करण्याबद्दल! यशवंतरावांनी होकार दिला, व ते पार्लमेंटरी सेक्रेटरी झाले ते मोरारजींचे.

त्या दिवसापासून जो स्नेहसंबंध घडून आला त्याचा यशवंतराव भावनापूर्णतेनं उल्लेख करतात.

शिस्त, वक्तशीरपणा, सूक्ष्म अभ्यास, अधिक कसोशीनं काम करण्याची संवय दृढ व्हायला हा योगायोग खचितच कारणीभूत आहे असं आजही ते मानतात.

भारताचे संरक्षणमंत्री म्हणून यशवंतराव १९६२ च्या नोव्हेंबरमध्ये दिल्लीला गेले. नवी जबाबदारी त्यांच्यावर पडली होती. राष्ट्राच्या संरक्षणाचा प्रश्नही त्यांनी अभ्यासपूर्ण पद्धतीने, योजकतेने हाताळला. संरक्षण उत्पादनाची वाढ, अत्याधुनिक साधनांची सुसज्जता, याचबरोबर याही बाबतींत स्वावलंबन व स्वदेशी, हे त्यांच्या या कार्यक्रमाचें मुख्य धोरण होतें.

सैन्यदलातील दिवंगत तसेच सध्या नोकरीवर असलेल्यांच्या कुटुंबियांच्या, कल्याण योजनांनाही त्यांनी चालना दिली. आघाडीवरचा वीर आपल्या कुटुंबाच्या काळजींतून निश्चिंत असावा व त्यानं प्राणपणानं कर्तव्यमग्न राहावं, त्याचं मनोधैर्य टिकावं, वगैरे गोष्टी लक्षांत घेऊन, दिलेल्या कामगिरीवरून परतल्यानंतर अशा सैनिकांना योग्य अशा नोकऱ्या देण्याची सूचना राज्यसरकारांना देण्यांत आली. वैद्यकीय उपचार, व्यावसायिक वा तांत्रिक शिक्षण व कायम उत्पन्नाची तरतूद या आवश्यकता लक्षांत घेऊन सैनिकांच्या मुलांच्या शिक्षणासाठीं विद्यावेतनें मंजूर केलीं गेलीं. जे शूर जवान वा अधिकारी सीमेचं रक्षण करतांना धारातीर्थी पडतील, त्यांच्या कुटुंबियांना खास निवृत्तीवेतनाचीही सोय करण्यांत आली. तसंच विश्वविद्यालयांतूनही लष्करी शिक्षणाला आवश्यक विषयाचं स्थान देण्यांत आलं.

यशवंतराव संरक्षणमंत्री असतांना त्यांनी आणलेल्या सुसूत्रतेनं भारतीय सैन्याने १९६५ च्या युद्धांत मोलाची कामगिरी करून यशाचं निशाण रोवलं.

“ इंग्लंडच्या इतिहासांत डंकर्क एकदाच झाले. अमेरिकेच्या इतिहासांत पर्लहार्बर एकदाच झाले. भारताच्या इतिहासांत सेला आणि तावांग या अखेरच्याच घटना ठराव्यात; अशी तयारी करून देश समर्थ करणे हे आमचें लक्ष्य असलें पाहिजे. हे लक्ष्य गांठण्यासाठीं जे जे प्रयत्न करावे लागतील, ते ते युद्ध प्रयत्न आहेत. ”

" कोणीही वांकड्या नजरेनं आपल्याकडे पाहूं शकणार नाहीं, इतकी संरक्षणसिद्धता आपण ठेवली पाहिजे. आपण सर्वजण युयुत्सु बनल्याशिवाय हे जमणार नाहीं. भगवान बुद्ध, छत्रपती शिवाजी, महाराणा प्रताप, महात्मा गांधी यांची भूमी गुलाम बनूं शकणार नाहीं, संकटांत देखील निर्धाराने जगायला शिकलें पाहिजे. " असे यशवंतराव म्हणत असत.

भारताचे संरक्षणमंत्री असतांना यशवंतराव १९६५ मध्यें भारत–पाक संघर्षाच्यावेळी आघाडीवर जाऊन तिथल्या जवानांना आणि सीमेवरील उद्ध्वस्त झालेल्या खेडुतांना भेटत असत. त्यावेळची एक हकीकत त्यांनीच एकदां सांगितली होती. नेत्याला प्रेरणा आणि उत्साह देण्याचें कार्य, जनता किती नकळत करूं शकते याचें प्रत्यंतर त्या अनुभवांत आहे.

भारतीय सीमेवरील ते एक उद्ध्वस्त खेडें होतें. पाकिस्तानी अत्याचाऱ्यांशीं लढतां लढतां त्या गांवांतील एका वृद्ध विधवेचे सगळेच्या सगळे मुलगे कामीं आले होते. यशवंतरावांना त्या निराधार स्त्रीवरील ती आपत्ती पाहून फार वाईट वाटलें. तिचं सांत्वन कसं करायचं हा त्यांना प्रश्न पडला. दिलगिरीयुक्त व क्षमायाचनापूर्ण शब्दांनी त्यांनी त्या वृद्धेचं सांत्वन करण्याचा प्रयत्न केला, तेव्हां ती वृद्धा म्हणाली, " चव्हाणसाहेब, मला दुःख फक्त एवढंच आहे कीं मला फक्त तीनच मुलगे होते. जर आणखी असते तर देशरक्षणाच्या कामीं अत्याचाऱ्यांचा समाचार घ्यायला मी त्यांनाही जरूर पाठवले असते. तेही या कामगिरीवर असतांना वीरगती पावते तरच त्यांना जन्म देण्याचें सार्थक झालें असंच मी म्हटलं असतं. "

संरक्षणमंत्री झाल्यावर यशवंतरावांनी संरक्षणखात्याची नुसती माहितीच करून घेतली नव्हे, तर जगांतील बलाढ्य राष्ट्रांच्या संरक्षण-व्यवस्थेचाही आमूलाग्र अभ्यास केला. त्या विषयावर प्रभुत्व मिळवलं आणि भारताची शान विजयश्रीनं लखलखीत केली. ' शान न उसकी जाने पाओ। चाहे जान भलेही जाओ। विश्वविजय करके दिखलाओ। तब होवे प्रण पूर्ण हमारा। झंडा ऊँचा रहे हमारा ॥' हो तर यशवंतरावांची मनोमनीची प्रतिज्ञा. ही प्रतिज्ञा पुरी करणारी विजयश्री त्यांना सदैव ' यशवंतच ' च करणारी ठरली.

* *

## ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ १३

यशवंतरावांच्या आयुष्यांत, ' कठीण समय येतां कोण कामास येतो ? ' या प्रश्नाचं उत्तर व्हायचं भाग्य लाभलेलं आहे. १९६२ च्या चीन–भारत संघर्षानं यशवंतरावांना भारताचे संरक्षणमंत्रिपद स्वीकारायला लावलं. तशीच कांहींशी कठिण परिस्थिती १९६६ नोव्हेंबरमध्यें गृहखात्याची आली. भारताचे संरक्षणमंत्री म्हणून यशवंतरावांची एव्हाना भारताच्या अणुरेणूशी जवळची ओळख झाली होती आणि सगळ्या भारताला यशवंतरावांच्या कर्तबगारीविषयीं विश्वास निर्माण झाला होता.

७ नोव्हेंबर १९६६ रोजी गोवधबंदीसंबंधी लोकसभेपुढे विराट निदर्शनं झालीं आणि त्यांतून जो गोंधळ निर्माण झाला, त्यामुळं त्यावेळचे गृहमंत्री गुलझारीलाल नंदा यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला आणि प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी तो स्वीकारलाही. गृहमंत्रिपदाची पुष्कळांना हवीहवीशी असणारी जागा रिकामी झाली आणि कुणाचा पायपोस ना कुणाच्या पायीं, अशा मतामतांच्या गलबल्यांत गृहमंत्रिपदाची धुरा, मोठ्या विश्वासानं, पंतप्रधानांनी यशवंतरावांच्या हातीं सोंपविली.

चार वर्षं संरक्षणखात्यांत काम करून, तिथं जीव जडवल्यानंतर, तिथून निघून पुन्हा वावटळींत पडायचं कुणाच्याही जिवावर आलं असतं, पण यशवंतरावांचा पिंडच कर्तव्यतत्पर देशभक्ताचा आहे. पडेल तें काम निष्ठेने आणि चोखपणे, बिनतक्रार करत राहायचं हा त्यांचा स्वभाव आहे. स्नेहरज्जूंत गुंतलेल्या भावना, संरक्षणखाते सोडतांना हेलावल्या, तरीही कर्तव्यांत कसूर झाली नाहीं आणि १४ नोव्हेंबर १९६६ रोजी यशवंत-रावांनी गृहमंत्रिपदाची सूत्रं आपल्या हातीं घेतली आणि त्यांचा अभ्यास

पुन्हा सुरू झाला. अमेरिका, इंग्लंड, रशिया, चीन आदि सर्व राष्ट्रांतील राज्यकारभारपद्धतीचा त्यांनी सूक्ष्म अभ्यास सुरू केला. भारताचा इतिहास, भारतांतील समस्या आणि शासनाची कर्तव्यं, अर्जुनाला दिसणाऱ्या पक्ष्याच्या डोळ्याप्रमाणं त्यांची कर्तव्यं ठरलीं. कायदा आणि सुव्यवस्था ही तांतडीची गरज होती. आर्थिक समस्या, अनिश्चितता, अंतर्गत कलह, अशा कितीतरी रोगजंतूंची साफसफाई करणं आवश्यक झालं होतं. संत फत्तेसिंहांनी चंदिगढ पंजाबला मिळावं म्हणून आत्मदहनाची धमकी दिलेली होती. राज्याराज्यांतून असंतोषाचं वारं उफाळलेलं होतं. विद्यार्थ्यांच्या चळवळींनी उग्र रूप धारण केलेलं होतं. गोवधबंदीची निदर्शनं म्हणजे शासनाचं अवघड जागेचं दुखणं झालेलं होतं आणि अशा वेळी—

सोळा नोव्हेंबर १९६६ च्या लोकसभेत गृहमंत्री म्हणून यशवंतरावांनी पहिली सलामी गाजवली. कणखर नेतृत्वाचं आणि परखड पण संतुलित विचारांचं दर्शन घडवलं. त्यानंतरचं सबंध वर्ष धामधुमींत गेलं. संकटं आलीं. हार, प्रहार दोन्ही सोसावे लागले, पण यशवंतरावांनी ते सारं धैर्यानं स्वीकारलं. व्यक्तिगत सुखदुःखांपेक्षा, त्यांच्या दृष्टीने देश अधिक महत्त्वाचा होता. भारतमातेची निःस्पृहपणे केलेली सेवा अधिक मोलाची होती. कौतुकाची वा सन्मानांची स्पृहा हे त्यांचं साध्य व साधन नव्हतं. व्यक्तिगत हल्ल्यांकडे त्यांनी लक्ष दिलं नाही. १९६७ च्या पोलिस चळवळीनं पुन्हा एकदा अस्थिर वातावरण निर्माण केलं. कुंपणानंच शेत खाण्याचा प्रकार ! यशवंतरावांनी मोठ्या कणखरपणं ही समस्या सोडवली आणि त्याचबरोबर मनांत कसलीही कटुता न ठेवतां पोलिसांच्या अडीअडचणींचा, त्यांच्या कुटुंबियांच्या सुखदुःखाचा विचार, प्रामुख्यानं लक्षांत घेण्यासाठी पोलिसकर्मचारी संघाला मान्यता दिली. पोलिसांच्यासाठीं घरबांधणी करायला पन्नास लाख रुपये मंजूर करण्यांत आले.

१९६६ ते १९७० पर्यंतच्या चार वर्षांत राज्याराज्यांतील अस्थिरता कमी करण्यांत आणि कायदा व सुव्यवस्था जारी करण्यांत यशवंतराव यशस्वी झाले.

※ ※

## १५ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤ ¤

१९७० च्या जून महिन्यांत पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी यशवंतरावांवर अर्थमंत्री म्हणून जबाबदारी सोंपविली. १९६९ साली बँक राष्ट्रीयिकरणावरून श्री. मुरारजी देसाई यांना अर्थमंत्रीपदावरून पंतप्रधानांनी मुक्त केलं होतं आणि तेंव्हांपासून भले भले ज्या पदावरून अवमानित होऊन फेकले गेले, त्या कठीण कामगिरीवर घ्यायला पंतप्रधान कर्तबगार व्यक्ती शोधत होत्या.

जबाबदारी पडली कीं ती स्वयंसेवकाच्या वृत्तीनं स्वीकारायची आणि तनमनधन लावून पुरी करीत राहाण्याचा यशवंतरावांचा स्वभाव आहे. अजूनपर्यंत त्यांच्या फजितीची वाट पहाणाऱ्यांची फजिती यशवंतरावांच्या कर्तबगारीने बिनबोभाट केली आहे. कठीण कामं सांभाळण्याची ताकद कठीण कामं स्वीकारूनच वाढत राहाते या विधायक दृष्टीनंच ते वांट्याला आलेल्या कामगिरीकडे पहातात.

अर्थशास्त्र आणि इतिहास हा यशवंतरावांचा विश्वविद्यालयीन परीक्षेचा विषय होताच आणि दरिद्रिनारायणाच्या समाजजीवनाच्या अवलोकनांत, अनुभवांत त्यांनी या अर्थहीनतेनं ओढवलेला अनर्थ पाहिला होता. घायलकी गत घायल जाने। तसा निर्धनतेचा अनुभव त्यांना दूरचा नव्हता.

अर्थमंत्रिपद स्वीकारतांना गृहखात्याचे जडलेले पाश दूर करणं दुःखदायकच होतं. तथापि पुनश्च नव्या अभ्यासाला सुरुवात झाली. सगळ्या विश्वाला सळो की पळो करून सोडणारा अर्थ भारताच्या गंगाजळींत, पुनश्च सुजलाम, सुफलाम होण्यासाठीं भगिरथ प्रयत्नांनी आणणं आवश्यक होतं. लोकशाहीची धुरा घेऊन जननी जन्मभूमीचा सन्मान करायला निघालेल्या या वज्रादपि कठोराणि। मृदूनि कुसुमादपि। विनम्र सेवकाची नवी कामगिरी नव्या उमेदीनं सुरू झाली.

घरोघरीच्या अर्थव्यवस्थेत मिळवणारा एक आणि खाणारी दहा तोंडं हे तर तुटीच्या भगदाडाचं प्रमुख कारण ! भारताच्या अर्थव्यवस्थेंत अशी खिंडारं ठायीं ठायीं पडलेलीं आहेत. दशदिशांनी मागण्यांचा गजर होत आहे. जे मिळेल ते कुठं आणि केव्हां स्वाहा होतं, याचाही पत्ता लागत नाहीं. खाणाऱ्यांची तोंडं शुक्लेंदुप्रमाणं वाढती आहेत आणि त्याचबरोबर हक्क आणि मागण्यासुद्धां ! देशाचं आपण कांहीं देणं लागतों ही भावना स्वप्नांतसुद्धा जनमानसाला स्पर्श करते की नाहीं अशीच शंका यावी. मिळवणाऱ्यांचे हात व उत्पादनक्षमता वाढल्याशिवाय ही खिंडारं बुजवतां येणार नाहींत आणि अर्थमंत्रिपदाला, शिक्षणखात्याचं ' शहाणे करून सोडावे, सकळ जन ' हे काम बहुजनहिताय, बहुजन-सुखाय हातांत घ्यावं लागेल, तेव्हांच ' योगक्षेमम् वहाम्यहम् ' चं वचन डोळस श्रद्धा निर्माण करील आणि समाजांत स्वास्थ्याचं वारं खेळूं लागेल. यशवंत-रावांनी स्वीकारलेली ही अर्थमंत्रिपदाची जबाबदारी म्हणजे पित्याचं व्यवहारज्ञान आणि कर्तबगारी व मातेचं वात्सल्य व कोंड्याचा मांडा करून का होईना पण साजरं करणारी मातृवत्सल द्रौपदीची थाळी आहे. सर्वांना कर्तबगार आणि तृप्त पाहण्याची या मनाला आस आहे.

※ ※

८९४३८ त्रा.न.
३८८२ १।३।८४

## १६ ☼ ☼ ☼ ☼ ☼ ☼ ☼ ☼ ☼ ☼ ☼ ☼ ☼ ☼ ☼ ☼ ☼ ☼

यशवंतरावांना सगळेच मितभाषी म्हणतात. परंतु जे मोजकं ते बोलतात तें ऐकणाऱ्याला तासन् तास विचार करायला पुरेल. एकदा असंच बोलतां बोलतां ते संघटनेबद्दल आणि उठणाऱ्या वावड्यांबद्दल बोलत होते. आणि त्यांनी दोन बैलांची सुप्रसिद्ध गोष्ट सांगितली.

दोन बैलांची दोस्ती तुटतां तुटत नव्हती आणि एका सिंहाला एकाच वेळी दोन बैलांशी एकदम मुकाबला करणं कठीण होतं. तेव्हां या बैलांची जोडी युक्तीनं फोडावी व त्यांना एकटं एकटं गांठून माराव असं त्या सिंहानं ठरवलं.

एकदा दोन्ही बैल नेहमींप्रमाणे एकत्र चरत असतांना सिंहानं त्यांपैकी एकालाच जवळ बोलावलं. दुसऱ्याचं लक्ष या हालचालींकडे संपूर्ण खिळलेलं आहे असं पाहूनच सिंहानं त्या जवळ आलेल्या बैलाच्या कानांत 'कांहीं नाहीं परत जा' एवढंच म्हटलं. बैल परत गेला. दुसऱ्या बैलानं विचारलं सिंहानं कानांत काय सांगितलं! त्यावर त्या बैलानं सांगितलं 'कांहीं नाहीं. परत जा' एवढंच म्हणाला तो. दुसऱ्या बैलाचा या गोष्टीवर कांहीं केल्या विश्वास बसेना. एवढ्यासाठीं सिंहानं जवळ बोलावलं, कानांत कुजबुजला. नक्कीच कांहींतरी गुपित आहे. या संशयानं त्या दोन बैलांत भांडण निर्माण झालं. त्यांची जोडी फुटली, मैत्री तुटली. याचा फायदा घेऊन मग त्या सिंहानं एक एक करीत त्या दोन्ही बैलांना खाऊन टाकलं.

गोष्ट साधीच होती. सर्वांना ठाऊक असणारीच होती. पण संघटनेला केलेलं तें चतुर मार्गदर्शन होतं. कुठल्याही अफवेवर विश्वास ठेऊन आणि संशयाचं बीज रोवून स्वतःचा आणि संघटनेचा किती भयंकर घात साधला जातो, हे त्यांनी या गोष्टीद्वारें दाखवून दिलं. कुठल्याही

चावडीवर विश्वास ठेऊन सर्वनाश ओढवण्याऐवजी स्वतःच समतोलबुद्धीनं खरेपणा पारखून पहावा हा विचार त्यांनी नुसता सांगितलाच नाहीं तर 'बोले तैसा चाले' या उक्तीप्रमाणं आचरलाही.

अफवांवर विश्वास ठेऊन, विरोधकांच्या बोलण्यानं तोल ढांसळून घेऊन त्यांनी संघटना सोडली नाहीं. त्यासाठीं अनेकविध लोकापवाद सोसले. परंतु यशवंतरावांच्या निर्मळ विचारांची एक श्रद्धा आहे. 'झेंडा भल्या कामाचा जो घेऊन निघाला। काटेकुटे वाटेमंदी बोंचति त्येला। रगत निघलं तरिभी हंसल। शाबास त्येची। तूं चाल पुढं तुला रं गड्या भीति कशाची। मन शुद्ध तुझं गोष्ट हाये पृथ्विमोलाची।

त्यांच्या आयुष्याची दिशा ठरलेली आहे. ध्येय एकच आहे. जिवांत जीव असेपर्यंत जननी जन्मभूमीची सेवा ! पडेल ती जबाबदारी पत्करून निष्ठेनं केलेली सेवा ! !

योगायोगानं यशवंतरावांच्या आयुष्यांत अनेक गोष्टी घडत आल्या. कुटुंबवत्सल असूनही संतानमोहाचा पाश नियतीनं त्यांच्यासाठी योजलेला नाही. त्यांच्या स्वतःच्या संतानाला आयुष्य लाभलं नाहीं, तरी भारतमातेच्या संतानांना सुखाचं आयुष्य लाभावं म्हणून ते देहभान विसरून काम करत असतात. हौसेमौजेचा काळ भ्रमंतींत, हालअपेष्टांत काढल्यानंतर आतां आलेल्या स्वस्थ कुटुंबजीवनांतील स्वास्थ्य चाखायला त्यांना घडीभराचीही उसंत नाहीं.

सुखाची सारी चवच नष्ट करणारा विरोध त्यांच्या अनुभवांच्या पांचवीला पुजलेला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळांत परकीय शासनाशीं सामना देतांनाही, समाजांतील हितशत्रूंचा विरोध त्यांना पचवावा लागला. स्वातंत्र्योत्तर काळांत आतां भारतीय शासनाचे विरोधक त्यांना विधायक कार्यासाठीं लागणारी उसंत आणि स्वास्थ्यही लाभूं देणं मुष्कील करतात; तिथं वैयक्तिक सुखस्वास्थ्याचा प्रश्नच उरत नाहीं. खंत एवढीच राहून राहून असते कीं दोन पावलं प्रगतीचीं टाकलीं न टाकलीं तों चार पावलं विध्वंसाचा जोष घेऊन येतात, आणि स्वतः बसलेली फांदी स्वतःच तोडण्याचा आततायीपणा अजाण जनतेकडून घडवतात. या देशांत घडणारा कुठलाही विध्वंस स्वतःच स्वतःच्या मालमत्तेचा नाश करणारा आहे, हे अविचाराच्या आवेगांत विसरलं जातं. आपल्या मनाप्रमाणें घरांत घडत नाहीं म्हणून स्वतःच स्वतःच्या घरालाच आग लावण्याचे प्रकार घडवले जातात. आणि देशद्रोह्यांना, समाजकंटकांना या संधीचा गैरफायदा घेणं सुलभ होतं.

फळं चाखण्यासाठी आतुर झालेल्यांनाही नुसतं रोप लावल्याबरोबर अधिरेपणा करून चालत नाहीं. काल पेरलं आणि आज उगवलं असं होत

नाहीं. त्यासाठी खतपाणी, निगराणी, डोळ्यांत तेल घालून करावी लागते मोहोर धरला नाहीं म्हणून कांहीं कलम कुणी उपटत नाहीं, तोडत नाहीं. प्रयत्नांची शिकस्त करीत, आजूबाजूच्या विध्वंसक प्रवृत्तींचा समाचार घेऊन धीरानं वाट पाहावी लागते. मगच एकाच बीजा पोटी । जन्म घेती तरु कोटी कोटी ' असं सामर्थ्य असणारें गोमटें फळ मिळतें. कलम लावणाऱ्याच्या ह्यातींतही कदाचित फळ धरणार नाहीं ! म्हणून कांहीं त्या रोप लावण्याचें महत्त्व कमी होत नाही. सत्कर्माचं बीज पुढच्या पिढींसाठीची तरतूद असते. ' तुला नाहीं, मला नाहीं घाल कुत्र्याला ' अशा विध्वंसानं सर्वनाशापलिकडं काय मिळणार ? जें घडवायला एक पिढी अपुरी पडली, ते श्रम जर केवळ अधिऱ्या आततायीपणानं मातीमोल केले तर पुन्हा तेंच तितकंच निर्माण करीपर्यंत आणखी एक पिढी खर्ची होईल. स्वराज्य कांहीं चुटकीच्या मंत्राने मिळालेलं नाहीं, तसंच सुराज्यही जादूनं जुलूमजबरदस्तीच्या हुकूमशाहीनं निर्माण होणार नाहीं. कुरकुरणाऱ्या आवाजांची मुस्कुटदाबी म्हणजे आबादी आबाद नव्हे. सुराज्याचा देखावा जाहिरातबाजीसाठीं करणं वेगळं आणि आपलेपणाच्या भावनेनं ओथंबून व्यक्तिशः प्रत्येकानं सुराज्यनिर्मितीमधला आपला वांटा उचलणं वेगळं ! सेतुबंधनाच्या कामांत चिमुकल्या खारीच्या शेपटीनं गोळा केलेली मातीही लाखमोलाची ठरते.

एकदा प्रवास करतांना यशवंतराव जुन्या आठवणींत रंगले होते. कोल्हापूरच्या त्यांच्या कॉलेजजीवनांतील आठवणी जागृत झाल्या होत्या. आणि बोलतां बोलतां अनुयायांत प्रिय असणाऱ्या नेतृत्वाची गोष्ट निघाली. अगदी थोरल्या बाजीरावांपासून तों कालपरवांपर्यंतच्या नेतृत्वांतील विशेषांचा यशवंतरावांचा अभ्यास किती सूक्ष्म आहे व विचार किती सखोल आहेत याची साक्ष त्यांच्या बोलण्यांत होती. इतर सेनापतींप्रमाणे थोरले बाजीराव आपल्या स्वतंत्र राहुटींत न राहातां व केवळ आपल्या प्रतिष्ठेचा, आकांक्षाचाच विचार न करतां सर्वसामान्य सैनिकाच्या सुखदुःखाचा, आकांक्षेचा भावनांचा विचार करीत असत व इतर सर्वसामान्य सैनिकांप्रमाणंच घोड्यावरच मांड ठोकून वेळप्रसंगी केवळ हुरडा खाऊनही राहात असत ही आख्यायिका सांगून ते म्हणाले होते—

" नेतेपदाचा अहंकार न ठेवतां अनुयायांसमवेत आहार-विहार, मनन, चिंतन व कार्य करणाऱ्या नेतृत्वाविषयी अनुयायांत दृढ निष्ठा निर्माण होते. रावणाचा नाश करण्याचं ईश्वरी कार्य पुरं होण्यासाठीं प्रभुरामचंद्रालाही चौदा वर्षं दंडकारण्यांत राहून तिथल्या प्रजेचा विश्वास, निष्ठा व सहकार संपादन करण्यासाठीं, जनजागृतीसाठीं, त्यांच्यापैकीच एक होऊन राहावं लागलं, व त्यांतूनच रामराज्याचा जन्म झाला हें विसरून चालणार नाहीं. रामराज्य हें आपलं ध्येय आहे. या आदर्शवादात लोकांशी समरस होऊन, त्यांची सुखदुःखं समजून घेऊन, त्यांच्या अडचणींविषयीं त्यांच्या दृष्टिकोनांतून पाहून, सहानुभूतिपूर्वक व आपपरभाव विसरून, जनतेंतच स्वतःच्या अभिवृद्धीची आंच निर्माण करायला हवी. जो स्वतःच स्वतःला मदत करूं शकत नाहीं, त्याला मदत द्यायला परमेश्वरही अपुराच पडेल. जनताशिक्षणाचं आणि जनजागृतीचं महत्कार्य समर्थ रामदासांनी अविरत भ्रमंतींतून चालवलं म्हणूनच हिंदवी स्वराज्याचं स्वप्नं रायगडावर ' प्रतिपचंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता । ' अशी राजमुद्रा घेऊन आकाराला आलं. "

आमचं बोलणं समर्थ रामदासांवर आलं तेव्हां स्वाभाविकच ' मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्रधर्म वाढवावा। यांतली, आजच्या काळांत जाणवणारी संकुचित प्रांतीयता कुणीतरी बोट ठेऊन खड्याप्रमाणं दाखवली.

यशवंतराव हंसले आणि म्हणाले, "सूर्य मुंबईवर प्रकाशत होता म्हणून तो संकुचित प्रांतीय म्हणण्याप्रमाणंच हा अर्थाचा अनर्थ आहे. भारतभर भ्रमंती करून आसेतुहिमाचल जनजागृती आणि लोकशिक्षणाचं, संघटनेचं कार्य करणाऱ्या समर्थांना ' मराठा ' शब्दांतील ' मरहट्ठा ' हा अर्थ उमजलाच नव्हता, असं म्हणण्याचा संकुचितपणा नाहीं का होणार यांत? मातृभूमीच्या रक्षणासाठीं मरेल पण हटणार नाहीं अशा वीरवृत्तीचा मेळ करा आणि महान राष्ट्रधर्म वाढवा हीच प्रेरणा समर्थांनीं दिली, म्हणूनच उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत, पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत हिंदवी स्वराज्याचे पाईक परचक्राशीं लढायला तहानभूक विसरून धांवत होते. संस्कृत येत असलं तर महत् राष्ट्रमचा संधीच महाराष्ट्राच्या निर्मितीपाशीं कारणीभूत असतो, हे नव्यानं सांगायला नको. उत्तर आणि दक्षिण, पूर्व आणि पश्चिम यांच्या संधीसाठी; हे महान राष्ट्र निर्माण करण्यासाठीच लाल, बाल आणि पाल ही आधुनिक त्रिमूर्ति संदेश देऊन गेली आहे.

एक ध्येय, एक लढा, आणि एक बाणा ठेऊनच आपण स्वराज्याची मंझील गांठली. आपापसांत भांडून, विध्वंस करून, आपल्या शक्तीचे, आपल्या सामर्थ्याचे, तुकडे होतां कामा नयेत.

लोकशाही म्हणजे जबरदस्तीशाही नव्हे कीं दंडेलशाही नव्हे. मतस्वातंत्र्य म्हणजे देशविघातक, राष्ट्रविध्वंसक मतांसाठीचे स्वातंत्र्य नाहीं. या देशांतील सुखसमृद्धीसाठीं, देशाच्या अभिवृद्धीसाठीं–प्रत्येकाला जन्मजात

लाभलेलं जबाबदार नागरिकाचं ते स्वातंत्र्य आहे आणि या स्वातंत्र्याच्या रक्षणाची जबाबदारी तुमची, माझी, सर्वांचीच आहे. त्यासाठीं आवाज उठवण्याचा हक्क तुमचा, माझा, सर्वांचाच आहे. पाश्चात्य जगाने हा सामाजिक समाजवादाचा झेंडा रोवण्याआधींच आमच्या भारतीय द्रष्ट्यांनी ॐ सहनाववतु। सहनौ भुनक्तु। सहवीर्यं करवावहै। तेजस्विनावधीतमस्तु। मा विद्विषावहै। अशी प्रार्थना नित्याचरणांत आणली होती. सर्वेत्रः सुखिनः सन्तु। सर्वे सन्तु निरामयाः। सर्वे भद्राणि पश्यन्तु। मा कश्चित् दुःखमाप्नुयात्। या नित्यवचनांतून सर्वांच्या हितवर्धनाची इच्छा बाळगण्याचंच ध्येय रोजच्या आचाराविचारांसाठीं या द्रष्ट्यांनीं केव्हांच देऊन ठेवलेलें आहे. त्यांत सबंध मानवतेचा विचार आहे. संकुचित प्रांतीयतेचा नाहीं."

यशवंतरावांनी निरनिराळ्या राजकीय प्रणालींचा अभ्यासू वृत्तीने अभ्यास केला. बुद्धिप्रामाण्य, दैनंदिन अनुभव, समाजाचं प्रत्यक्ष अवलोकन या साऱ्यांतून कुठल्याही राजकीय प्रणालीचें अंतिम ध्येय मानवता आणि जनहित यांसाठींच असावें याची खूणगांठ समजून घेतली. हिंसेतून वाढणाऱ्या हिंसेला सीमा उरत नाहीं, आणि त्यांतून विध्वंसापलिकडे कांहींही शाश्वत साध्य होत नाहीं, हा त्यांचा ठाम विश्वास आहे. क्षणमात्र भावनातिशयतेनं रागालोभाचा येणारा उमाळा क्षणमात्रच टिकणारा असला तर, भरतीला फुटणारी लाट ओहोटीला किनाऱ्यावर फक्त आंत ओढलेल्या वाळूचे चऱ्होटेच ओढून संपते तसं होईल. मागे राहाणाऱ्या खुणा आपण कांहींतरी गमावल्याच्याच राहाव्यात हे कुणाला आवडेल ?

संतवाङ्मय, समाजद्रष्ट्यांचें विचार, लोकनेत्यांचे मार्गदर्शन या अशाच मानवतावादी, सहिष्णुतेंतून निर्माण झालेलें असतें. ही सहिष्णुता, सहृदय मानवता यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाचा आत्मा आहे आणि हेच त्यांचं तत्त्वज्ञान आहे.

नुसतं भाषाप्रभुत्व असलेले लेखक असण्यापेक्षां समाजाला प्रेरणा देणारे, मानवतावादी दृष्टिकोन देणारे साहित्यिक यशवंतरावांना अभिप्रेत आहेत. ते म्हणतात, " जग अशा एका उंबरठ्यावर उभं आहे कीं पुढं दोनच मार्ग आहेत. एक मार्ग आहे विनाशाकडे, विध्वंसाकडे नेणारा; तर दुसरा जीवनोन्मुख करणारा, प्रगतीकडे नेणारा. भाषेची बंधनं झुगारून देऊन साहित्यिकांनी समाजाला स्वातंत्र्याच्या, प्रगतीच्या मार्गाकडे नेलं पाहिजे. भांबावलेल्या जगाला वैचारिक मार्गदर्शनानं, मानवतेच्या मार्गानं जीवनोन्मुख केलं पाहिजे. "

यशवंतराव म्हणतात, " जर आपण स्वच्छ मनानं आणि मुद्याला धरून विचार केला, आपली वृत्ती कणखर ठेवली तर आपल्याला योग्य मार्ग न अडखळता बिनचूक सांपडतो. "

“ भारतीय शेतकरी अशिक्षित असेल, पण तो शहाणा असतो. तो निरक्षर असेल, त्याला संतवाङ्मय शब्दाशब्दानं वाचता येणार नाहीं, पण त्याच्या अंतःकरणांत आणि दैनंदिन जीवनांत संतांनी सांगितलेला आचार-धर्म प्रत्यक्षांत आलेला असतो. शहाणपण आणि ज्ञान कांहीं फक्त पुस्तकांतच नसतें. अनुभव, सखोल चिंतनसुद्धा माणसाला खूप शहाणपण शिकवणारें ठरतें. ”

यशवंतरावांमध्ये भारताला द्रष्ट्या नेतृत्वाचा लाभ झालेला आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडांत जेव्हां जेव्हां भारताला अडचणींशीं सामना करण्याची निकराची वेळ आली, तेव्हां तेव्हां यशवंतरावांच्या कणखर नेतृत्वाने, दूरदृष्टी योजकतेने आणि सहृदय माणुसकीने भारताची शान उंचावली आहे.

※ ※

IRBK-0115089